**<u>प्रेसनोट</u>** दि. 13/10/2025

**अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे घटकाकडून कोंढवा पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल विरूध्द लाच मागणी व स्विकारली तसेच सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याविरूध्द प्रोत्साहन दिल्याची कारवाई केलेबाबत.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | कोंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर आयुक्तालय |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन 1988 चे कलमान्वये. |
| **तक्रारदार** | पुरुष, वय 44 वर्ष |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | 1)सोमनाथ बापू महारनवर, वय 34 वर्षे, पद पोलीस शिपाई, कोंढवा पोलीस स्टेशन, पत्ता- फ्लॅट नं.4, ओम नमो रेसिडेन्सी, शेवाळवाडी ता. हवेली जि.पुणे. **(वर्ग :- 3)**<br>2)युवराज कृष्णा फरांदे, वय 59 वर्षे, सेवानिवृत्त पोलीस उप निरीक्षक, रा. स्वप्नपुर्ती बंगला, वृंदावन सोसायटी, उरूळी देवाची, ता. हवेली, जि. पुणे. |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | रू. 10,000/-(दहा हजार रूपये) |
| **पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम** | रू. 5,000/-(पाच हजार रूपये) |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | रू. 5,000/-(पाच हजार रूपये) लाच रक्कम स्विकारली. |
| **पडताळणी दिनांक** | दि. 10/10/2025, दि. 11/10/2025 |
| **सापळा दिनांक** | दि. 13/10/2025 |
| **ठिकाण** | कोंढवा पोलीस स्टेशन समोर, पुणे शहर आयुक्तालय |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती निता मिसाळ, सहा. पोलीस आयुक्त,लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9822214414) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती असावरी शेडगे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 8425808058) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार यांच्याविरूद्ध कोंढवा पोलीस स्टेशन येथे दाखल असणाऱ्या वीज चोरीच्या गुन्ह्यामध्ये मदत करण्यासाठी तसेच सदर गुन्ह्यात अटक न करण्यासाठी कोंढवा पोलीस ठाण्यातील पोलीस सोमनाथ महारनवर हे 10,000/- रूपयांची लाच मागत असल्याची तक्रार तक्रारदार यांनी दिनांक 10/10/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे, यांचेकडे दिली होती.

तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ला.प्र.वि. पुणे पथकाने दिनांक 10/10/2025 आणि 11/10/2025 रोजी पडताळणी कारवाई केली असता दि. 11/10/2025 रोजीच्या पडताळणीमध्ये अलोसे क्र. 1 यांनी तक्रारदाराकडे लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तक्रारदार व त्यांचे घरमालक हे आरोपी असलेल्या वीज चोरीच्या गुन्ह्यांमध्ये आलोसे क्र. 1 यांनी तक्रारदार यांचे घरमालकाकडून दाखल गुन्ह्यात मदत करण्यासाठी यापूर्वीच रक्कम रूपये 5000/- स्वीकारले होते. परंतु आलोसे क्र.1 यास 5 हजार रूपये दिल्याबाबत इतरत्र चर्चा झाल्याने आलोसे क्र.1 यांनी तक्रारदार यांना पोलीस स्टेशनला बोलावून जे 5 हजार रूपये तू मला देणार होता ते तू तुझ्या घर मालकाला नेऊन दे असे बोलून लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच त्याच्या लाच मागणीस आरोपी क्र. 2 यांनी फोनद्वारे प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे आज दि. 13/10/2025 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. 1 यांनी तक्रारदार यांना व त्यांचे घर मालकास पोलीस स्टेशनला बोलावून तक्रारदार यांना त्यांचे घरमालक यांच्याकडे 5 हजार रूपये देण्यास सांगितले. तक्रारदार यांचे घरमालक यांनी कोंढवा पोलीस स्टेशनचे बाहेर आलोसे क्र.1 यांचे समक्ष तक्रारदाराकडून 5000/- रूपयाची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे. त्याबाबत कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे आरोपी क्र.1 व 2 यांच्याविरूद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक** - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.